स.के.क्र. ३२२ /२०२६
नि.क्र. २ /ब

रोहा येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड यांच्या न्यायालयात
(पिठासीन अधिकारी श्री एस. व्ही. खैरे )

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याची तारीख | 06 / 01 / 2026 |
| २ | प्रथम माहिती अहवाल व पोलीस ठाणे | आर.पी.एफ पोस्ट रोहा गु.र.नं 07 / 2026 |
| ३ | प्रथम माहिती अहवाल दाखल दिनांक | 06 / 01 / 2026 |
| ४ | फिर्यादी/अहवाल देणार | उप निरीक्षक आर.पी.एफ चौकी, रोहा |
| ५ | आरोपीचे नाव, वय व पत्ता | राज लारवन वर्मा<br>वय- 24 वर्षे,<br>रा. मु.पो.- अष्टमी ता. रोहा<br>जिल्हा -रायगड |
| | गुन्हयाचा तपशिल | भारतीय रेल्वे अधिनियम कलम 144(a) |

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्हयाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.
आरोपीला अपराधाचे विवरण त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगीतले.

आरोपीचे प्रतिकथन -

१. तुम्हाला आरोपपत्र व संपूर्ण कागदपत्रांच्या नकला मिळाल्या आहेत काय?

उत्तर- होय.

२. तुम्हाला समजावून सांगीतलेला उपरोक्त गुन्हयाचा तपशील समजला आहे काय?

उत्तर- होय.

३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर- मला गुन्हा कबुल आहे.

आरोपीची सही/अंगठा
स्थळ : रोहा.
दिनांक - १४/०३/२०२६.

(एस.व्ही.खैरे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रोहा.

Received Fine Amount of

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
रोहा, ता.रोहा, जि.रायगड

स.के.क्र. ३२२ /२०२६
नि.क्र. ३ /ब

## न्यायनिर्णय

सदर आरोपीविरूध्द रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम 144(a) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आज रोजी आरोपीने न्यायालयात सदर प्रकरणात स्वच्छेने गुन्हा कबुल करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. गुन्हा कबुल केल्याबाबतची पुरशिस आरोपीने निशाणी क्र. 2 वर दाखल केली आहे. आरोपीला गुन्हा कबुल केल्यानंतर होणा-या परिणामाची जाणीव करून देण्यात आली. त्यानंतर देखील आरोपीने स्वमर्जीने गुन्हा कबुल केला आहे. वरील प्राप्त परिस्थती लक्षात घेतली असता, सरकार पक्षाची तक्रारमधील कथने निर्विवादपणे सिद्ध झालेली आहेत. त्यामुळे आरोपीला सदर गुन्हाकरिता दोषी धरण्यात येत आहे. आरोपीने दया दाखविणेस विनंती केली आहे. त्याने नमुद केली की, तो घरातील एकमेव कमविता व्यक्ती आहे. आरोपीने केलेली विनंती, आरोपीचे वय, गुन्हाचे स्वरूप लक्षात घेता, आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल, करिता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

आरोपीस रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम 144(a) अन्वये गुन्हा केल्याबाबत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये दोषी पकडण्यात येते. सदर गुन्हयाकरीता आरोपीला रक्कम रु 500/- द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावीण्यात येते. आरोपीने सदरील दंडाची रक्कम न भरल्यास त्याला 5 दिवसांची साध्या कैदेची शिक्षा ठोठावीण्यात येते.

स्थळ : रोहा
दिनांक -- १४/०३/२०२६.

(एस.व्ही.खैरे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रोहा

Received Fine Amount of Rs-500/-
(only Five Hundred Rs)
पा.क्र. 1067

14/03/2026
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
रोहा, ता.रोहा, जि.रायगड